पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ८/१२/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ७६४**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा-कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे ऑक्टोंबर २०२० चा कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप-१/४००० दि.२४/११/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७६५**

मा.सौ.सुजाता शेट्टी व मा.श्रीमती लता राजगुरु यांचे दि.२/१२/२०२० चे पत्र.

पुणे म.न.पा.च्या अंशदायी योजना ज्यांना ज्यांना लाभ मिळतो त्यांचा दंत इलाजाकरिता होणारा पुर्ण खर्च अंशदायी योजनेतून करण्यात यावा.

**विषय क्र. ७६६**

मा.आबा बागुल व मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि.२/१२/२०२० चे पत्र.

महाराष्ट्र राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३/०३/२०२० पासून लागू करून खंड २,३,४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केली आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.समय/२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व.का.), दि.१८मार्च, २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोविड१९) प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले होते. महाराष्ट्र राज्य शासनाने दि.२४ मार्च, २०२० ते १७ मे, २०२० व १४ जुलै,२०२० ते २३ जुलै, २०२० या कालावधीत ६५ दिवसांचा लॉकडाऊन कालावधी जाहीर करणेत आला होता. सदर कालावधी मध्ये सर्व लोकल सेवा / परिवहन सेवा व इतर दैनिक प्रवासी सेवा बंद करणेत आलेल्या होत्या. त्यामुळे अत्यावश्यक सेवेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कामाच्या ठिकाणी ये-जा करण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. तसेच सदरच्या लॉकडाऊनमुळे अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व दैनंदिन सेवा तसेच हॉटेल, रेस्टॉरंट व भोजनालय बंद करण्यात आलेली होती. त्यामुळे सदरहून कर्मचारी यांना भोजनाची व्यवस्था उपलब्ध झाली नाही.

पुणे महानगरपालिका नियमित सेवेतील तसेच अत्यावश्यक सेवेतील सर्वच अधिकारी/कर्मचारी यांनी जोखीम पत्करून कामावर हजार राहून त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडली आहे. कोरोना विषाणूचा प्रसार व त्यावरील उपाययोजना अंतर्गत महानगरपालिकेने विविध स्थापन केलेले कक्ष, रुग्णालये, कोविड केअर सेंटरमध्ये महापालिकेतील बहुतांशी सर्वच विभाग व विभागातील अधिकारी/कर्मचारी लॉकडाऊन कालावधीत देखील वेळेचे बंधन न पाळता नेमून दिलेले काम करीत आहेत. दि.२४ मार्च, २०२० ते १७ मे, २०२० व १४ जुलै,२०२० ते २३ जुलै, २०२० या

कालावधीत ६५ दिवसांचा लॉकडाऊन कालावधीमध्ये कोरोना विषयक काम करणारे मनपा कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी, ठेकेदारी पद्धतीने असलेले कर्मचारी यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या प्रमाणात हजर दिवसाप्रमाणे प्रतिदिन र.रु.१५०/- प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा.

**विषय क्र. ७६७**

मा.वनराज आंदेकर यांचे दि.२/१२/२०२० चे पत्र.

पुणे नाना पेठ घरांक क्र. ५६१अ/ब/१, ५६१/ब/१अ व ५६२ मधील जागा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असून या जागेत पुणे मनपाचा महत्वाकांक्षी प्रकल्प "वारकरी भवन" उभारण्यात यावे.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. ७६८**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/४५३ दि.१/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ७६९**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १/११/२०२० ते दि.१५/११/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/४५४ दि.१/१२/२०२० चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ७७०**

प्रभाग क्र. ४० ड आंबेगाव बु. येथील रेलिकॉन सिटी शेजारी मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर ॲन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,६४,१२५=५० पेक्षा २५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,४८,०९४=१२ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,०१,७७१=२९ असे एकुण र.रुपये ३७,४९,८६५=४१ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/४१८ दि.४/११/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७७१**

पुणे महानगरपालिकेच्या पुणे मनपाने सुचित केलेल्या ठिकाणी १३ KL क्षमतेची क्रायोजनिक लिक्विड ऑक्सीजन टँक पुरविणे, बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्पार्क इंडस्ट्रीज यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.३६,५०,०००/– पेक्षा ३.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,३६,४८५/– अधिक जी.एस.टी. १८% र.रुपये ६,३६,५६७=३० असे एकूण रक्कम रुपये ४१,७३,०५२=३० पर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/४१९ दि.५/११/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७७२**

पुणे शहरामध्ये विविध उत्सव, पालखी सोहळा व कार्यक्रमांसाठी भाडेतत्वावर आवश्यकतेनुसार पोर्टेबल टॉयलेट पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.आदित्य एंटरप्रायजेस यांचे एकच टेंडर आले (पुर्वगणनपत्रक र.रु.४९,९९,०५०/- पेक्षा १६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,९९,२०२/- जीएसटीसह पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेसोबत करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/४२१ दि.५/११/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७७३**

मा.आबा बागुल यांचे दि.११/११/२०२० चे पत्र.

आर्किटेक्ट सायली रितेश कुलकर्णी यांची रिएलिटी फर्स्ट प्रा.लि. या नावाने फर्म असून त्यांचेकडून सिटी डेव्हलपमेंट या विषयावर काम चालू आहे.

तरी आर्किटेक्ट सायली रितेश कुलकर्णी, रिएलिटी फर्स्ट प्रा.लि. यांची पुणे महापालिकेच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नियुक्ती करण्यात यावी.

(टिप : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**प्रभारी नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**